असा. क्र. ५३ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, नोव्हेंबर १, २००६/कार्तिक १०, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

**पृष्ठे**

**सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.**— महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश .. .. .. .. .. ३७२–३७५

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ नोव्हेंबर २००६.

## MAHARASHTRA ORDINANCE No. XIV OF 2006.

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

## सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४.

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

१९६४ चा महा. २०.



[किंमत : रुपये ९.००]

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २००६ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ याच्या कलम १३ मध्ये,— १९६४ चा महा. २०.

(क) पोट-कलम (१) मध्ये, खंड (अ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (अ) बाजार क्षेत्रात राहणारे (जिल्हाधिकाऱ्याने याबाबतीत वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास एकवीस वर्षांहून कमी वयाचे नसतील असे) खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पंधरा शेतकरी,—

(एक) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखाली केलेले नियम यांच्या अर्थांतर्गत असलेल्या, बाजार क्षेत्रात काम करणाऱ्या कृषी पतसंस्था आणि बहुउद्देशीय सहकारी संस्था (Multipurpose Co-operative Societies) यांच्या व्यवस्थापन समित्यांच्या सभासदांनी निवडून दिलेले अकरा सदस्य (यापैकी दोन महिला असतील, एक इतर मागास वर्गाची व्यक्ती असेल आणि एक निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमातीची व्यक्ती असेल): १९६१ चा महा. २४.

परंतु जर बाजार समिती ही आदिवासी क्षेत्रात असेल तर, निरधिसूचित जमातीच्या (विमुक्त जातीच्या) किंवा भटक्या जमातीच्या व्यक्तीची निवड करण्याऐवजी अनुसूचित जमातीच्या एका व्यक्तीची उपरोक्तप्रमाणे निवड करण्यात येईल ; आणि

(दोन) अशा बाजार समितीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी निवडून दिलेले चार सदस्य (यापैकी एक अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची व्यक्ती असेल आणि एक आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाची व्यक्ती असेल) ;";

(ख) पोट-कलम (१अ) मध्ये, खंड (अ) मधील, उपखंड (सहा) ऐवजी, पुढील उपखंड दाखल करण्यात येईल :—

" (सहा) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे पाच प्रतिनिधी (यांपैकी दोन महिला असतील, एकजण अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातींची व्यक्ती असेल, एकजण इतर मागासवर्गाची व्यक्ती असेल आणि एकजण निरधिसूचित जमातींची (विमुक्त जातींची) किंवा भटक्या जमातींची व्यक्ती असेल) ;";

(ग) पोट-कलम (१ब) मध्ये, खंड (क) मधील, उपखंड (सहा) नंतर, पुढील उपखंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (सहा-अ) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे चार प्रतिनिधी (यांपैकी एक महिला असेल, एकजण अनुसूचित जातींची किंवा अनुसूचित जमातींची व्यक्ती असेल, एकजण इतर मागास वर्गाची व्यक्ती असेल आणि एकजण निरधिसूचित जमातींची (विमुक्त जातींची) किंवा भटक्या जमातींची व्यक्ती असेल):

परंतु, विभागीय किंवा प्रादेशिक बाजार समिती आदिवासी क्षेत्रात असेल तर, राज्य शासन, निरधिसूचित जमातींच्या (विमुक्त जातींच्या) किंवा भटक्या जमातींच्या व्यक्तीच्या जागी अनुसूचित जमातींच्या व्यक्तीस नामनिर्देशित करील ;”.

## निवेदन.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०) यामध्ये, बाजार समित्यांवर महिला व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील व्यक्ती यांसाठी जागा राखून ठेवण्यासह बाजार समित्यांच्या रचनेसाठी तरतूद आहे.

२. सहकारी संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर इतर मागासवर्गासाठी एक जादा जागा राखून ठेवणे आणि निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी आणखी एक जागा राखून ठेवणे यांसाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र शासनाने, सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ अधिनियमित करून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) याच्या कलम ७३ख च्या तरतुदींमध्ये सुधारणा केली आहे.

३. बाजार समित्यावंर तशाच प्रकारचे आरक्षण करण्यासाठी, विधानसभा सदस्यांकडून व इतर व्यक्तींकडून आलेली अनेक निवेदने विचारात घेता, उक्त कलम १३ मध्ये यथोचित सुधारणा करून, बाजार समित्यांवर इतर मागासवर्ग आणि निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), किंवा भटक्या जमाती यातील व्यक्तींसाठी जागा राखून ठेवण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे असे वाटते.

४. आदिवासी क्षेत्रांमध्ये असलेल्या समित्यांच्या बाबतीत, अनुसूचित जमातींच्या व्यक्तींना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यासाठी, अशा समित्या घटीत करण्यासंबंधात विशेष तरतूददेखील करण्यात आली आहे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०), यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ३१ ऑक्टोबर २००६.

**एस्. एम्. कृष्णा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जे. पी. डांगे,
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई